RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष १०, अंक १०१] सोमवार, जुलै २९, २०२४/श्रावण ७, शके १९४६ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक २७८

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

### जलसंपदा विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २९ जुलै २०२४.

### अधिसूचना

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५.

क्रमांक मजनिप्रा-२०१८/४६०/(प्र.क्र.१२७/१८-भाग-१)/जसं(आस्था).—महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ च्या कलम ३ च्या पोट-कलम (५) तसेच कलम ४ च्या पोट-कलम (१) च्या खंड (घ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत समर्थन करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ च्या कलम ५ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या निवड समितीने शिफारस केल्यानुसार दिनांक १२ ऑगस्ट, २००५ च्या जलसंपदा विभागाची अधिसूचना क्रमांक मजनिप्रा निवड २००५/७८/०५ द्वारे उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या पोट-कलम (१) अन्वये स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाचे भूजल व्यवस्थापन क्षेत्रातील तज्ज्ञ सदस्य म्हणून डॉ. प्रभात कुमार जैन, यांची नियुक्ती करीत आहेत. ही नियुक्ती त्या पदावर रुजू झाल्याच्या दिनांकापासून तीन वर्षाच्या कालावधीसाठी किंवा त्यांच्या वयाची सत्तर वर्षे पूर्ण होईपर्यंत यापैकी जो दिनांक आधी येईल त्या दिनांकापर्यंत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

डॉ. संजय बेलसरे,
शासनाचे सचिव (लाक्षेवि).

कार्यभार स्वीकारला दि. 93/08/2024



भाग चार-ब-२७८-१